# वाहतूक कोंडी टाळण्यासाठी गायमुख घाट रस्त्याची डागडुजी व डांबरीकरण करा


दिवा न्यूज
दिशादर्शक, मार्गदर्शक!
वर्ष-४
अंक - ३३
epaper.diwanews.com
www.diwanews.com ♦ सोमवार, १७ मार्च २०२५ ♦ पाने-८ ♦ संपादक-सुहास खंडागळे ♦ किमंत-४ रु. RNI No.-MAHMAR/2021/80669


## पालिका आयुक्तांचे निर्देश

घोडबंदर परिसरातील समस्यांबाबत महापालिकेत झाली बैठक...

पान-४वर


# चला लोकसहभागातून तयार करूया



# दिवा शहराचा विकास आराखडा



आपल्या शहराचा नियोजनबद्ध विकास होण्यासाठी आपल्या मनातील संकल्पना आपण मांडू!

आपण दिवेकर जनता आहोत.त्यामुळे येथील समस्या आपल्यालाच माहित आहेत त्यावर काय उपाय योजना असाव्यात यासाठी जनतेच्या मनातील विकास आराखडा आपण तयार करू!

दिवा शहराच्या सर्वांगीण विकासाचा तुमच्या मनातील संकल्प आम्हाला कळवा

नागरिकांनी दिवा शहरातील समस्या सोडवण्यासाठी मांडलेले विचार, संकल्पना महापालिकेपर्यंत पोहोचवल्या जातील व पहिल्या तीन क्रमांकांना योग्य ती बक्षीस दिली जातील.

तुम्ही तयार केलेला विकास आराखडा या क्रमांकावर पाठवा:- 92216 04204

सौ.ज्योती राजकांत पाटील
दिवा शहर महिला संघटिका

शिवसेना
उद्धव बाळासाहेब ठाकरे

# अनधिकृत बांधकामांच्या ठिकाणी खंडणीवसूलीसाठी अधिकाऱ्यांमध्ये स्पर्धा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'क्लिन टीएमसी' मोहीम हाती घ्यावी,परांजपे यांचे आवाहन

## आनंद परांजपे यांचा आरोप, महापालिका मुख्यालयासमोर राष्ट्रवादी कॉंग्रेस कचरा टाकणार

**ठाणे:** ठाणे शहरात मोठ्या प्रमाणावर कचरा साचला असून, सामान्य ठाणेकर त्रस्त आहेत. या प्रश्नावर तीन ते चार दिवसांत महापालिका प्रशासनाने तोडगा न काढल्यास राष्ट्रवादी कॉंग्रेसकडून महापालिका मुख्यालयासमोर कचरा टाकला जाईल, असा खणखणीत इशारा राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिला. तसेच मुंबई महापालिकेतून ब्लॅक लिस्ट केलेल्या एका विशिष्ट ठेकेदारासाठी कचरा कोंडी घडविली जात आहे का, असा सवाल करीत मुंब्रा येथील अनधिकृत बांधकामांच्या ठिकाणांहून वसूली करण्यासाठी ठाणे महापालिकेतील काही अधिकाऱ्यांमध्ये स्पर्धा लागली आहे. या प्रकाराची दखल घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'क्लिन टीएमसी' मोहीम हाती घ्यावी, असे आवाहन परांजपे यांनी केले.

ठाणे शहरात ठिकठिकाणी साचलेल्या कचऱ्यामुळे ठाणेकरांची होणारी गैरसोय आणि मुंब्रा येथील अनधिकृत बांधकामांच्या ठिकाणावरून केल्या जाणाऱ्या खंडणीवसूलीच्या व्हायरल झालेल्या व्हिडिओ संदर्भात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे यांनी आज पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी ते बोलत होते.

ठाणे शहरात कचऱ्याच्या डंपिंगचा प्रश्न सोडविण्यात प्रशासनाला अपयश आले आहे. या प्रकाराला प्रशासन जबाबदार आहे. तसेच वर्षानुवर्षे सत्ता राबविणाऱ्या पक्षाची कचऱ्यावर तोडगा काढण्याची नैतिक जबाबदारीही होती, असे नमूद करीत आनंद परांजपे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबई महापालिकेतील १४०० कोटी रुपयांच्या कामामधून ब्लॅक लिस्ट केलेल्या एका विशिष्ट ठेकेदाराला ठाण्यातील ठेका मिळावा, यासाठी हा खेळ खेळला जात आहे का, असा सवाल केला. ठाण्यातील निविदा प्रक्रियेची मुदत पूर्ण झाली असूनही निविदा उघडली गेलेले नाही, असा आरोप परांजपे यांनी केला. या प्रकारातून ठाणेकरांच्या जीवाशी खेळले जात आहे, अशी टीका परांजपे यांनी केली.

काही दिवसांपूर्वी समाजमाध्यमांवरील व्हायरल व्हिडिओतून काही खंडणीखोरांना पळवून लावल्याचे दिसले होते. गेल्या दोन-तीन वर्षांपासून मुंब्र्यात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे सुरू असून, मुंब्र्यात सहायक आयुक्त म्हणून कोण जाणार, याबाबत स्पर्धा सुरू झाली आहे. महापालिकेचा एक अधिकारी २८ फेब्रुवारी रोजी निवृत्त झाल्यानंतर, त्याच्या जागी वसूली करण्यासाठी महापालिकेच्या अधिकाऱ्यांमध्ये स्पर्धा सुरू आहे. अनधिकृत बांधकामे सुरू असलेल्या खान कंपाऊड, सहारा सिटी यासारख्या भागात आयुक्त सौरभ राव यांनी जाऊन पाहणी करावी, असे आवाहन आनंद परांजपे यांनी केले.

गेल्या वर्षी विधानसभेच्या अधिवेशनात मुंब्रा येथील बिलाल शेख हा महापालिकेच्या अधिकाऱ्यासाठी खंडणी वसूली करीत असल्याचा आरोप आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला होता. मात्र, आता त्याला पुन्हा पक्षात घेतले आहे. त्यामुळे त्या ठिकाणी फेसबूक लाईव्ह जितेंद्र आव्हाड करणार का, असा सवाल परांजपे यांनी केला. या प्रकरणाची पोलिस आयुक्तांनी दखल घ्यावी, असे आवाहनही परांजपे यांनी केले. ठाणे महापालिकेतील अनेक अधिकारी वर्षानुवर्षे त्याच पदावर कार्यरत आहेत. या प्रकाराची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चौकशी करून 'क्लिन टीएमसी' अभियान राबवून ठाणेकरांना चांगले प्रशासन द्यावे, अशी मागणी आनंद परांजपे यांनी केली. या विषयासंदर्भात उपमुख्यमंत्री अजित पवार यांची राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सरचिटणीस नजीब मुल्ला व इतर पदाधिकाऱ्यांसह भेट घेऊन माहिती दिली जाईल. तसेच कठोर कारवाईची मागणी करण्यात येईल, असे परांजपे यांनी सांगितले.


## एकल वापराच्या प्लास्टिकच्या विरोधात ठाणे महानगरपालिकेची कारवाई,१००२ दुकानांची केली तपासणी, ७८ किलो प्लास्टिक जप्त

**ठाणे** : ठाणे महानगरपालिका क्षेत्रात पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यासाठी एकल वापराच्या प्लास्टिकच्या विरोधात कारवाई सुरू करण्यात आली आहे. नौपाडा, वागळे इस्टेट आणि माजिवडा-मानपाडा या तीन प्रभाग समिती क्षेत्रात १००२ दुकानांची तपासणी करण्यात आली. त्यात ७८ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले असून २७ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे.

पर्यावरणपूरक होळी साजरी करताना एकल वापराच्या प्लास्टिकचा वापर रोखण्यासाठी महापालिकेने प्रभाग समिती निहाय कारवाई सुरू केली आहे. घनकचरा व्यवस्थापन विभाग व प्रभाग समितीतील कर्मचारी यांच्या समन्वयाने ही कारवाई सुरू असून इतर प्रभाग समिती क्षेत्रातही कारवाई केली जात असल्याचे प्रदूषण नियंत्रण अधिकारी मनीषा प्रधान यांनी सांगितले.

दरम्यान, ०१ एप्रिल, २०२४ ते ०६ मार्च, २०२५ या काळात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि ठाणे महानगरपालिकेच्या प्रदूषण नियंत्रण कक्षाचे प्रतिनिधी यांनी एकल वापराच्या प्लास्टिकच्या बंदीबाबत मोहीम हाती घेण्यात आली. त्यात, एकूण ४१८० आस्थापनांना भेट दिली. त्यातून २१३९ किलो प्लास्टिक जप्त करण्यात आले. तर, दंडापोटी १३ लाख ५६ हजार ६०० रुपये वसूल करण्यात आले.

## ठाण्यात दोन धावत्या गाड्या पेटल्या ; चौघे बचावले



**ठाणे:** येथील वेगवेगळ्या दोन ठिकाणी धावत्या दोन गाड्यांनी काही तासांच्या अंतरावर अचानक पेट घेतला. सुदैवाने दोन्ही घटनांमध्ये वाहन चालकांनी प्रसंगावधान दाखवत कार रस्त्याच्या एका बाजूला उभी करून कारमधून बाहेर पलायन केले. या दोन्ही घटनेत चौघे जण बचावले असून या घटना मंगळवारी रात्री कोपरी आनंदनगर आणि घोडबंदर रोड गायमुख रोडवर घडल्या आहेत.

### कार चालक अजय कुमार हे भिवंडी येथील

मे . मोनार एंटरप्राइझेस या कंपनीचे कर्मचारी स्मिता हाटकर (४२), अजहर सय्यद ( ४५ ) या दोघांना घेऊन भिवंडी येथून भायखळा निघाले होते. त्यांची गाडी सायंकाळी सहा वाजण्याच्या सुमारास कोपरी, आनंदनगर सिग्नल जवळ आल्यावर अचानक तिने पेट घेतला. आग लागल्याची घटना समोर येताच चालकांनी गाडी रस्त्याच्या बाजूला करून गाडीतून बाहेर पलायन केले. ही घटना २० मिनिटांत नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. दुसरी घटना रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास घोडबंदर रोड गायमुख गाव येथे घडली. त्या गाडीला आग लागताच चालकाने तेथून पळ काढला. या आगीत गुजरात पासिंग असलेली गाडी पूर्णपणे जळून नुकसान झाले आहे. तसेच ही आग जवळपास ४० मिनीटांनी नियंत्रणात आली. अशी माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

## सीपी तलाव डम्पिंगवरील कचऱ्यामधुन धुर


**ठाणे:** वागळे बस डेपो बाजूला असलेल्या सीपी तलाव डम्पिंग ग्राउंड येथील कचऱ्याला आग लागली नसून त्या कचऱ्यामधून धुर येत असल्याची बाब बुधवारी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी ठाणे महापालिका अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेत, त्या धुरावर पाणी मारून कुलिंग करण्यात आल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिध्दकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा.लि.प्लॉट क्र.डब्लू २३०,टीटीसी खैरणे,नवी मुंबई-४००७१०येथे छापून,श्रीकृपा बिल्डींग, ए विंग,पहिला माळा,फ्लॅट क्रमांक १०१,सेंट मेरी शाळेजवळ,दिवा(पूर्व) ठाणे -६१२ ता/जि-ठाणे,राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले.संपर्क-८०८०९७७९५५
संपादक -सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669

# दिवा शहरातील अस्वच्छतेवर महापालिका तोडगा काढेल काय?

## दिव्यात स्वच्छतेसाठी विशेष मोहिमेची गरज!

दिवा शहरात ठाणे महापालिकेने विशेष स्वच्छता मोहीम राबवण्याची गरज आहे.शहरातील अनेक भागांमध्ये कचरा समस्या मोठ्या प्रमाणात असल्याचे पाहायला मिळते.दिवा शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढली आहे. नागरीकरण वाढल्याने दिवा शहरातील अंतर्गत रस्ते, वस्त्यांमध्ये स्वच्छतेचा अभाव आहे.महापालिका प्रशासनाने खरंतर स्वच्छ दिवा उपक्रमासाठी विशेष मोहीम हाती घेणे गरजेचे आहे.शहरात स्वच्छता कर्मचारी वाढवण्याची गरज असून नागरिकांनाही शहर स्वच्छतेच्या अभियानात सामावून घेण्याची गरज आहे. येथील वस्त्यांमध्ये असणारा कचरा, इमारतींच्या मोकळ्या जागेमध्ये असणारा प्लास्टिक कचरा यामुळे शहर बकाल झाल्यासारखे दिसते. महापालिकेने स्वत:हून पुढाकार घेऊन शहरातील नागरिकांना स्वच्छतेचे धडे देखील द्यायला हवेत. जेणेकरून कुठेही कचरा टाकला जाणार नाही. त्याचबरोबर अंतर्गत परिसरामध्ये मोक्याच्या ठिकाणी सुका व ओला कचरा टाकण्यासाठी कचराकुंड्यांची व्यवस्था महापालिकेने करायला हवी.स्वच्छतेच्या बाबतीत दिवा शहरात बदल होणे गरजेचे असून यासाठी ठाणे महापालिकेचे आयुक्त स्थानिक प्रशासनाला सूचना देतील काय? हा खरा प्रश्न आहे.



# उष्माघात रुग्णांसाठी सिव्हील रुग्णालयात २५ खाटांचा वातानुकूलित कक्ष !

ठाणे : हिवाळ्यातच उष्म्याच्या त्रास ठाणेकरांना सहन करावा लागला असताना, आता ऐन उन्हाळ्यात पारा भलताच वाढताना दिसतो आहे. त्यामुळे उष्माघाताचा धोका वाढण्याची शक्यता असल्याने सिव्हील रुग्णालयात २५ खाटांचा विशेष वातानुकूलित कक्षात सर्व यंत्रणा सुसज्ज आहेत. उष्माघातापासून संरक्षण करण्यासाठी घराबाहेर पडताना टोपी, छत्री, पाणी, गॉगल सुती कपड्यांचा जास्तीत जास्त वापर करण्याचे आवाहन आरोग्य प्रशासनाने केली आहे. उष्म्याने रौद्ररूप धारण केल्याने काही दिवसांपासून ठाणे शहराचे तापमान प्रचंड प्रमाणात वाढले आहे. सकाळी नऊ नंतर उन्हाच्या झळा बसतात. दुपारच्या वेळेत घराबाहेर पडणे सर्वांसाठी त्रासदायक ठरत असून, ठाणे जिल्ह्याचे कमाल तापमान ३८ ते ४० अंशावर पोहोचले आहे. त्यामुळे वाढत्या तापमानाचा त्रास नागरिकांना होण्याची शक्यता आहे. कोणाला उष्माघाताचा त्रास झालाच तर उपचारासाठी सिव्हील रुग्णालय सज्ज आहे. रुग्णालयात २५ खाटांचा वातानुकूलित विशेष कक्ष निर्माण केला असल्याची माहिती जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी दिली.

### घराबाहेर पडताना टोपी, छत्री, पाणी, गॉगल, सुती कपड्यांचा जास्तीत जास्त वापर करावा

महत्वाचे काम असल्यास तरच दुपारच्या उन्हात बाहेर पडावे. उन्हाळ्यात जास्तीत जास्त पाणी प्यावेहलकी, पातळ सूती कपडे वापरावेत बाहेर जाताना गॉगल्स, छत्री टोपी, बुट व चपलांचा वापर करावा. प्रवास करताना पाण्याची बाटली सोबत ठेवावी

उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होत असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, लिंबू-पाणी, ताक इत्यादींचा नियमित वापर करावा. उष्माघात रुग्णांची संख्या वाढल्यास त्या प्रमाणे खाटा वाढवण्यात येतील.

-डॉ.कैलास पवार (जिल्हा शल्य चिकित्सक ठाणे)

# पावसाळ्यातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी गायमुख घाट रस्त्याची डागडुजी व डांबरीकरण करा- पालिका आयुक्तांचे निर्देश

## घोडबंदर परिसरातील समस्यांबाबत महापालिकेत झाली बैठक

**ठाणे :** वन खात्याकडून आवश्यक परवानगी प्राप्त मिळायची असल्याने गायमुख घाट रस्त्याचे काँक्रिटीकरण पावसाळ्यापूर्वी होणे शक्य नाही. त्यामुळे ऐन पावसाळ्यात या परिसरातील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी या घाट रस्त्याची व्यवस्थित डागडुजी व डांबरीकरण सार्वजनिक बांधकाम विभागाने करावे, असे निर्देश ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांनी दिले आहेत.गायमुख घाट ते फाउंटन हॉटेलपर्यंतचा रस्ता मीरा-भाईंदर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. मात्र, त्यावरील गायमुख घाट काँक्रिटीकरणाची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाने त्यापूर्वीच घेतलेली असून त्याची निविदा प्रक्रिया पूर्ण केलेली आहे. वन खात्याकडून परवानगी मिळाल्यानंतर या कामाचे कार्यादेश देण्यात येणार असल्याची माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाने दिली. या पार्श्वभूमीवर, आयुक्त सौरभ राव यांनी गायमुख घाट रस्त्याच्या डागडुजीकरण व डांबरीकरणाचे निर्देश दिले आहेत.




घोडबंदर रोडवरील नागरिकांना भेडसावत असलेल्या विविध समस्यांबाबत तोडगा काढण्यासाठी आयोजित करण्यात येत असलेल्या समन्वय बैठकीचे पुढील सत्र ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या दालनात सोमवारी सायंकाळी झाले. या बैठकीस, घोडबंदर रोड येथील 'जस्टीस फॉर घोडबंदर रोड फोरम'चे प्रतिनिधी, अतिरिक्त आयुक्त (२) प्रशांत रोडे, शहर अभियंता प्रशांत सोनाग्रा, पोलीस उपायुक्त (वाहतूक) पंकज शिरसाठ, सहायक संचालक, नगररचना संग्राम कानडे, उपनगर अभियंता विकास ढोले, विनोद पवार, सुधीर गायकवाड, शुभांगी केसवानी, उपायुक्त दिनेश तायडे, शंकर पाटोळे, मधुकर बोडके, घोडबंदर रस्ता येथे काम करणाऱ्या सर्व यंत्रणांचे समन्वयक कार्यकारी अभियंता संजय कदम, यांच्यासह ठाणे महापालिकेचे अधिकारी, मिरा- भाईंदर आणि नवी मुंबई येथील वाहतूक पोलीस अधिकारी, मेट्रो, महा मेट्रो, एमएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

'जस्टीस फॉर घोडबंदर रोड'च्या प्रतिनिधींनी गायमुख घाट दुरुस्तीबद्दल सद्यस्थिती जाणून घेतली. पावसाळ्यापूर्वी काँक्रिटीकरणाचे काम सुरू होणार नसल्याने, हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी ऐन पावसाळ्यात वाहतूक योग्य राहील, याची काळजी घ्यावी अशी सूचना केली. तसेच मेट्रो, सेवा रस्त्याचे एकत्रीकरण आणि भाईंदरपाडा व कासारवडवली उड्डाणपूल यांचे बांधकाम ही कामे सुरू असल्याने त्यात गायमुख रस्त्याच्या काँक्रिटीकरणाची भर घालू नये, अशी सूचना प्रतिनिधींनी केली. त्याला प्रतिसाद देताना महापालिका आयुक्त राव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून, तसेच वन विभागाच्या नागपूर कार्यालयातून परवानगीची सद्यस्थिती जाणून घेतली. सार्वजनिक बांधकाम विभागाने सादर केलेल्या प्रस्तावाबाबत वन विभागाने अधिकची माहिती मागवली आहे. या सगळ्या प्रक्रियेस लागणारा संभाव्य वेळ लक्षात घेऊन तुर्तास, येत्या पावसाळ्यात या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचा पर्याय शिल्लक असून त्याबद्दल सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने योग्य ती पावले उचलावीत, असे निर्देश आयुक्त राव यांनी दिले.

### कासारवडवली उड्डाणपूल

कासारवडवली उड्डाणपुलाच्या कामासंदर्भात झालेल्या चर्चेदरम्यान मेट्रोने दिनांक ३० आणि ३१ मार्च रोजी तेथील सर्व कामे पूर्ण करून घ्यावीत. तर, पाच आणि सहा एप्रिल रोजी सार्वजनिक

'जस्टीस फॉर घोडबंदर रोड'च्या प्रतिनिधींनी गायमुख घाट दुरुस्तीबद्दल सद्यस्थिती जाणून घेतली. पावसाळ्यापूर्वी काँक्रिटीकरणाचे काम सुरू होणार नसल्याने, हा रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी ऐन पावसाळ्यात वाहतूक योग्य राहील, याची काळजी घ्यावी अशी सूचना केली.
तसेच मेट्रो, सेवा रस्त्याचे एकत्रीकरण आणि भाईंदरपाडा व कासारवडवली उड्डाणपूल यांचे बांधकाम ही कामे सुरू असल्याने त्यात गायमुख रस्त्याच्या काँक्रिटीकरणाची भर घालू नये, अशी सूचना प्रतिनिधींनी केली. त्याला प्रतिसाद देताना महापालिका आयुक्त राव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून, तसेच वन विभागाच्या नागपूर कार्यालयातून परवानगीची सद्यस्थिती जाणून घेतली.

बांधकाम विभागाने रस्त्याची दुरुस्ती करावी. त्यासाठी त्यांना वाहतूक पोलिसांकडून आवश्यक ते सहकार्य देण्यात येईल, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले

### वॉर्डनची संख्या वाढणार

वाहतूक पोलिसांच्या मदतीसाठी नेमण्यात आलेल्या वॉर्डनच्या संख्येबद्दल या बैठकीत चर्चा झाली. त्यांच्या समस्या जाणून घेऊन पगाराविषयीचे प्रश्न सोडवून जास्तीत जास्त वॉर्डन रस्त्यावरती वाहतूक नियंत्रणासाठी उपयोगी येतील या दृष्टीने नियोजन करण्याचे निर्देश आयुक्त यांनी मेट्रो तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला दिले.

त्याचबरोबर, घोडबंदर रोड परिसरातील मोठ्या गृहनिर्माण सोसायटी, मॉल, शाळा, व्यावसायिक आस्थापना यांनी त्यांच्याकडील एक वॉर्डन हा त्यांच्या हद्दीच्या बाहेर वाहतुकीच्या सोयीसाठी तैनात करावा, असे पत्र महापालिका शहर विकास विभागामार्फत या सर्व आस्थापनांना देणार असल्याचेही आयुक्त राव यांनी सांगितले.

### रात्री नऊनंतरच अवजड वाहने

पावसाळ्याच्या काळामध्ये अवजड वाहनांची वाहतूक रात्री नऊनंतरच सुरू करावी. मुंबई आणि नवी मुंबईतून येणाऱ्या अवजड वाहनांविषयी समन्वय साधून त्यांचे नियंत्रण करण्यात यावे, अशी सूचना 'जस्टीस फॉर घोडबंदर रोड'च्या प्रतिनिधींनी केली. त्यासंदर्भात वाहतूक विभागाने अधिक चर्चा करून निर्णय घ्यावा, असे आयुक्त राव म्हणाले.

दरम्यान, आनंदनगर येथील आरएमसी प्लांटकडे कोणत्याही परवानगी नसल्याने काम थांबवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत, असेही आयुक्त राव यांनी स्पष्ट केले. वेगवेगळ्या आठवडी बाजाराला परवानगी देताना बाजार संपल्यानंतर श्रमदानाने महापालिकेच्या कर्मचाऱ्यांसोबत काम करून तो परिसर स्वच्छ ठेवण्याची अट परवानगी देतानाच घातली जाईल, असेही आयुक्त राव यांनी सांगितले. आनंदनगर मैदानात या आठवडी बाजाराला परवानगी देता येईल का याची व्यवहार्यता तपासून घेण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

याशिवाय, प्रलंबित कामे, सीसीटीव्ही नेटवर्क, सिग्नल परिसरातील रस्त्यांची डागडुजी, खोदकाम करताना विविध यंत्रणांमधील समन्वय आदी मुद्द्यांवरही या बैठकीत चर्चा झाली.

# उपमुख्यमंत्री यांना स्वत:च्या मतदारसंघातील कचऱ्याचा प्रश्न सोडवता आला नाही हे दुर्दैवी-राजन विचारे

**ठाणे:** ठाणे शहर तलावाचे नव्हे तर कचऱ्याचे शहर म्हणून ओळखले जावू लागले आहे. काही वर्षांपूर्वी ठाणे महापालिकेला स्वच्छतेचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. मात्र, शहरातील रस्त्यावर कचऱ्याचे ढीग लागले असताना उपमुख्यमंत्री यांना स्वत:च्या मतदारसंघातील कचऱ्याचा प्रश्न सोडवता आला नाही हे दुर्दैवी असल्याची खोचक टीका ठाकरे गटाचे नेते राजन विचारे यांनी एकनाथ शिंदे यांच्यावर केली. ठाण्याचा कचरा प्रश्न प्रकरणी ठाकरे गटाने गुरुवारी ठाणे महानगरपालिका



ठाकरे गटाने घेतली पालिका आयुक्तांची भेट

आयुक्त सौरभ राव यांची भेट घेत प्रशासनाला धारेवर धरले.

गेल्या ३ वर्षापासून ठाणेकर नागरिकांना अनेक प्रश्न भेडसावत आहेत. पाण्याची बोंबाबोंब आहे, रेंटल इमारती मध्ये राहणाऱ्या नागरिकाचे प्रश्न आहेत, डंपिंग ग्राउंड नाही, कामे न करता बिले काढली जात आहेत, बेकायदा बांधकामे उभी राहत असून यामध्ये प्रशासनातले अधिकारी कुचकामी ठरत असल्याची टीका विचारे यांनी केली. पालिका आयुक्त सौरभ राव यांनी याकडे तत्काळ लक्ष घालावे अशी मागणी विचारे यांनी केली. यावेळी त्यावेळी जिल्हाप्रमुख केदार दिघे, लोकसभा सचिव सुरेश मोहिते, संपर्क प्रमुख नरेश मणेरा, शहर प्रमुख प्रदीप शिंदे, प्रवक्ते अनिश गाढवे, समन्वयक संजय तरे, उप शहर प्रमुख वसंत गवाळे, सचिन चव्हाण, प्रदीप वाघ, विभाग प्रमुख प्रशांत सातपुते, लहू सावंत, संजय भोई, विनोद यादव, शाखाप्रमुख राजेंद्र महाडिक, अमोल हिंगे, रामेश्वर बचाटे, पप्पू आठवाल, युवसेना अधिकारी ओवळा माजिवडा नटेश पाटील, सुनंदा देशपांडे, महिला उपजिल्हा संघटक महेश्वरी तरे, शहर संघटक प्रमिला भांगे, महिला आघाडी सचिव शोभा गरंडे व इतर शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ठाण्यात यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासाठी राखीव भूखंडाचा गैरवापर

## यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीचे औचित्य साधून मनसेचे ठिय्या आंदोलन

**ठाणे** : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठासाठी ठाणे महानगरपालिकेने आरक्षित केलेला भूखंड शिक्षणाच्या उद्देशाने वापरण्याऐवजी अन्य व्यावसायिक उपक्रमांसाठी वापरला जात असल्याची गंभीर बाब महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे स्वप्नील महिंद्रकर यांनी उघड केली होती . या भूखंडावर कपडे आणि घरगुती वस्तूंच्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आल्याने, हा थेट भूखंडाच्या उद्देशाविरुद्धचा गैरवापर असल्याचे दिसून येत असताना देखील ठाणे महानगरपालिका झोपायचं सोंग करत होती. या निषेधार्थ बुधवारी मनसेने ठिय्या आंदोलन केले.
ठाणे महानगरपालिकेच्या प्रशासनाने पोखरण क्रमांक २, हिरानंदानीजवळील निहारिका संकुलाजवळ असलेला भूखंड यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाला कवडीमोल भावात भाडेतत्त्वावर दिला होता. ठाणे शहरात विद्यापीठाचे केंद्र नसल्याने, स्थानिक विद्यार्थ्यांना मुंबई किंवा अन्य ठिकाणी जाण्याची गरज भासू नये, हा मुख्य उद्देश होता. या भूखंडावर विद्यापीठाची स्थापना



करून ठाण्यातील विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्याचा महानगरपालिकेचा हेतू होता. गेल्या दहा वर्षांपासून हा भूखंड रिकामा होता, मात्र आता विद्यापीठ स्थापनेसाठी देण्यात आलेल्या जागेचा वापर व्यवसायिक कारणांसाठी केला जात आहे. या भूखंडावर विद्यापीठाऐवजी कपडे आणि घरगुती वस्तूंचे प्रदर्शन भरवण्यात आल्या कारणाने. मनसेच्या वतीने हा भूखंड खाली करण्यासाठी व भूखंड धारकाला भूखंडाचा व्यावसायिक वापर केल्याच्या अनुषंगाने त्याच्यावर कारवाई करण्यात यावी यासाठी महापालिका आयुक्त यांना निवेदन देखील देण्यात आले होते पण सदर निवेदनाची दखल न घेतल्या कारणाने बुधवारी मनसेचे ठाणे उपशहर अध्यक्ष पुष्कर विचारे यांच्यावतीने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ साठी आरक्षित असलेल्या भूखंडाच्या बाहेर ठिय्या आंदोलन करून प्रशासनाचा निषेध व्यक्त करण्यात आला तसेच भूखंड त्वरित अतिक्रमण मुक्त करण्यात आला नाही तर सदर विषयासंदर्भात शिक्षणमंत्र्यांकडे दाद मागण्यात येईल असे मनसेच्या वतीने नमूद करण्यात आले .या आंदोलनात किरण पाटील, नीलेश चौधरी,महेश चव्हाण,रवींद्र महाले,सागर भोसले,योगेश मोहिते मनसे पदाधिकारी उपस्थित होते.

# शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्याना सिक्युरिटी ; ठाण्यात गुन्हेगारी फोफावली,शिवसेना नेते राजन विचारे यांचा आरोप



**ठाणे:** शहरात खून, दरोडे, चोऱ्याचे प्रमाण वाढले आहेत. अत्यंत वर्दळीचा परिसर असलेल्या टेंभीनाक्या जवळील चरई परिसरात एका रात्रीत तब्बल १४ दुकाने चोरांनी फोडली असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. ठाणे शहरातील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये मनुष्यबळ कमी असताना, शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांना सिक्युरिटी दिली जात आहे. त्यामुळेच ठाण्यात गुन्हेगारी फोफावली आहे. असा आरोप उबाठाचे नेते राजन विचारे यांनी केला आहे.

गुरुवारी शिवसेना नेते राजन विचारे यांच्यासह ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे आदी पदाधिकाऱ्यांनी ठाणे शहर पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे यांची भेट घेतली. तसेच चरई पडलेल्या तब्बल १४ दुकानांसंदर्भात निवेदन दिले आहे. यावेळी विचारे यांनी वरील आरोप केला आहे. एकाच रात्री १४ दुकाने फोडल्याने त्या परिसरातील नागरिकांमध्ये व व्यापारी, व्यवसायिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यासंदर्भात सीसीटीव्ही फुटेज पोलिसांना दिलेली आहेत. तात्काळ याची दखल घेऊन या चोरास जेरबंद करावे. तसेच पोलीस बळ वाढवून संपूर्ण ठाणे शहरात रात्रीची पोलिसांची गस्त वाढवावी जेणेकरून चोरीचे प्रमाण व गुन्ह्यांचे प्रमाण कमी होण्यास मदत होईल. असेही विचारे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

# सर्वसामान्यांच्या जीवनात विकासरूपी सप्तरंगांची उधळण

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कुटुंबीय,कार्यकर्त्यांसह साजरी केली धुळवड

**ठाणे :** राज्यातील महायुती सरकार विकासकामातून आणि जनकल्याण योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या जीवनात आनंदाच्या सप्तरंगाची उधळण करीत असून राज्यातील जनतेच्या आयुष्यात सुखाचे आणि समृद्धीचे दिवस येवोत, अशा शब्दात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील जनतेला धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या.

दरम्यान देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना मॉरिशस सरकारच्यावतीने सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून त्यांच्यामुळे भारताचा जगात नावलौकिक वाढत आहे ही तमाम भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट असल्याचे सांगितले.

ठाणे येथील निवासस्थानी कुटुंबियासमवेत उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नैसर्गिक रंगांची उधळण करत धुलीवंदनाचा सण साजरा केला. यावेळी पत्नी सौ. लता, मुलगा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, स्नुषा वृषाली, नातू रूद्रांश यांच्यासह कार्यकर्ते, माध्यमांचे प्रतिनिधी, पोलिस यांच्यासोबत धुळवड साजरी केली.

धुलीवंदन हा सण सर्वांनी पर्यावरणपूरक पध्दतीने आणि नैसर्गिक रंगांच्या साथीने साजरा करावा असे आवाहन करत उपमुख्यमंत्र्यांनी राज्यातील जनतेला धुलीवंदनाच्या शुभेच्छा दिल्या. धुळवड खेळताना रासायनिक रंग टाळून नैसगिक रंगांचा वापर करावा. पर्यावरणाचा समतोल राखणे आपले



कर्तव्य असून काल होळी साजरी करताना महाराष्ट्र सुजलाम सुफलाम होवो अशी भावना व्यक्त केल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना सांगितले.

महाराष्ट्रात सणांची परंपरा असून राज्य शासनाच्या माध्यमातून महाराष्ट्राच्या जनतेच्या जीवनात सुखाचे, समृद्धीचे सप्तरंगाची उधळण होवो अशा शुभेच्छा दिल्या. विरोधकांना होळीच्या शुभेच्छा देतानाच त्यांनी सरकारच्या विकासाच्या विविध रंगात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भेटण्यासाठी प्रत्येक व्यक्तीबरोबरच त्यांच्या निवासस्थानी कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांपासून ते बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना रंग लावत धुळवडीच्या शुभेच्छा दिल्या.

**आनंदाश्रमात साजरी केली धुळवड ....**

परंपरेनुसार उपमुख्यमंत्री शिंदे यांनी टेंभी नाक्यावरील आनंदआश्रम येथे जावून धर्मवीर आनंद दिघे यांच्या तैलचित्राला रंग लावून त्यांना अभिवादन केले. तसेच आनंदाश्रम येथे जमलेल्या असंख्य शिवसैनिक आणि नागरिकांसोबत धुळवड साजरी केली.

# ठामपाच्या या आर्थिक वर्षात, कर थकबाकीदार नागरिकांवर दंडात्मक कारवाई न करता त्यांना अभय द्यावे

### ठाणे शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांची मागणी

**ठाणे:** ठाणे महानगर पालिकेच्या २०२४-२०२५ या आर्थिक वर्षात, कर थकबाकीदार नागरिकांवर दंडात्मक कारवाई न करता त्यांना अभय द्यावे अशा मागणीचे निवेदन ठाणे शहर (जिल्हा) काँग्रेस कमिटीच्या वतीने अध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांनी ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांना दिले.

ठाणे महानगर पालिकेतील निवासी नागरिकांवर मालमत्ता कर, पाणी पट्टी रक्कम मुदतीत न भरल्याने प्रशासन त्या रकमेवर शास्ती (दंड व व्याज) आकारणी करते, मालमत्ता कर हे महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे मुख्य स्त्रोत असले तरी थकबाकीदारांवर आकारलेला दंड व व्याज हे खूप वाढीव असते. तरी जनहितार्थ, सदर दंडात्मक रक्कम व व्याज प्रशासनाने माफ करून सर्वसामान्य जनतेला दिलासा द्यावा, व १५ मार्च ते १५ एप्रिल या कालावधीमध्ये ही 'अभय योजना' राबवावी, अशी विनंती या निवेदनात करून अशाप्रकारे थकबाकीवरील दंड व व्याज माफीची अभय योजना डोंबिवली-कल्याण महानगर पालिकेकडून राबविली गेली आहे असे नमूद करण्यात आले आहे.

तरी या संदर्भात त्वरित कार्यवाही होण्यासाठी आम्ही आपणांस विनंती करीत असे या निवेदनात शेवटी नमूद करून अतिरिक्त आयुक्त २ यांनाही देण्यात आल्याचे ठाणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. विक्रांत चव्हाण यांनी म्हटले आहे.

# भांडर्ली गावातील दोन गोडाऊनला आग १२ बकऱ्यांचा गुदमरून मृत्यू

**ठाणे:** मुंब्रा-पनवेल रोडवरीलन उत्तर शिव, भंडार्ली गाव परिसरात तात्पुरत्या स्वरूपात उभारलेल्या पत्र्याच्या दोन गोडाऊनला गुरुवारी सकाळी पावणेसहा वाजण्याच्या सुमारास आग लागली. या आगीत एका गोडाऊन मध्ये असलेल्या गाडीतील २५ ते ३० बकऱ्यांपैकी १२ बकऱ्यांचा आगीमुळे झालेल्या धुरात गुदमरून मृत्यू झाला आहे. तसेच ही आग दोन तासांच्या शर्थीच्या प्रयत्नांनंतर नियंत्रणात आणण्यात अग्निशमन दलाच्या जवानांना यश आले. यावेळी ठाणे महापालिका अग्निशमन दलाच्या मदतीला नवीमुंबई महापालिकेच्या कोपरखैरणे अग्निशमन दलाचे जवान धाव आले होते.

भांडर्ली गाव येथे पुठ्ठा, रबर व इतर भंगार साहित्य असलेल्या गोडाऊनला आग लागल्याची माहिती मिळताच, घटनास्थळी डायघर पोलीस अग्निशमन दलाच्या जवानांनी धाव घेतली.पुठ्ठा, रबर व इतर भंगार साहित्य असल्याने आगीने क्षणात रुद्र रूप धारण केले. या आगीची झळ बाजूच्या आणखी एका गोडाऊन बसली. अग्निशमन दलाच्या जवान घटनास्थळी दाखल झाल्यानंतर त्यांनी आगीवर तातडीने नियंत्रण मिळविण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. तेंव्हा कुठे ती आग दोन तासांनी नियंत्रणात आली. तसेच यावेळी झालेल्या मोठ्या प्रमाणातील धुरामध्ये एका गाडीत असलेल्या १२ बकऱ्यांचा गुदमरून मृत्यू झाल्याची बाब समोर आली. अशी माहिती ठामपा आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

# ठाण्यातून मायलेकी गायब

**ठाणे:** हिरानंदानी मिडोस जवळील धर्मवीर नगर येथे राहणाऱ्या २५ वर्षीय पूजा संतोष दिंडे आणि त्यांची २ वर्षीय मुलगी अशा मायलेकी अचानक ठाण्यातून गायब झाल्या आहेत. याप्रकरणी ठाणेनगर पोलीस ठाण्यात त्या दोघी हरवल्याची तक्रार नोंदविण्यात आली आहे. उंची ५ फूट ५ इंच आणि गोरा रंग असलेल्या पूजा यांना मराठी आणि तेलगू भाषा बोलता येत असून त्या मुलीची उंची २.५ इंच आणि अंगात लाल कलरचा फ्रॉक परिधान केला आहे. अशा मायलेकी कोणास आढळल्यास तर त्यांनी ठाणेनगर पोलीस स्टेशनशी संपर्क साधावा,असे आवाहन ठाणेनगर पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार ए.बी.पाटील यांनी केले आहे.

# गाडीवर झाड कोसळले

**ठाणे:** वसंतविहार या ठिकाणी उभ्या केलेल्या चारचाकी गाडीवर झाडे पडल्याची घटना गुरुवारी रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास समोर आली. या घटनेत त्या गाडीच्या छत व काच फुटून नुकसान झाले आहे. तसेच ते झाड रस्त्याच्या मधोमध पडल्याने वाहतूक कोंडी झाली होती. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापन आणि अग्निशमन दल या विभागांनी धाव घेत, ते झाड कापून बाजूला केल्यावर तो रस्ता वाहतूकीसाठी मोकळा करण्यात आला. सुदैवाने या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिली.

# जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत ठाण्याच्या प्रणवला दोन पदके

**ठाणे:** नवी दिल्लीत पहिल्यांदाच पार पडलेल्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धेत ठाण्याच्या प्रणव देसाई याने २०० मीटरमध्ये रौप्य आणि १०० मीटरमध्ये कांस्यपदक जिंकले. ही स्पर्धा ११ ते १३ मार्च २०२५ दरम्यान नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली.

मी माझ्या कामगिरीवर खूश आहे. ही एक चांगली स्पर्धा होती. या प्रकारच्या स्पर्धेमुळे मला भारतात आंतरराष्ट्रीय अनुभव मिळेल.- प्रणव देसाई.

प्रणवची ही सुधारित कामगिरी होती. त्याला भारतात आंतरराष्ट्रीय खेळाडूंविरुद्ध स्पर्धा करताना पाहून आनंद झाला. यामुळे त्याला आत्मविश्वास मिळाला आहे.- निलेश पाटकर, प्रशिक्षक.

# निवडणुकीपूर्वी लाडक्या बहिणीला दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करावी- शिवसेना (उबाठा) आघाडीची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



**ठाणे:** निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजना सुरु करून मानधन १५०० वरून २१०० रुपये करणार असे आश्वासन दिले होते. परंतु गेले दोन महिने मानधनच खात्यात जमा न झाल्याने महिलांच्या मनात शासनाच्या विरोधात असंतोष निर्माण झाला आहे. महिलांचा अपेक्षाभंग केल्यामुळे सरकारने तात्काळ महिलांना मानधन बँकेत जमा करावा, अशी मागणी ठाण्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या महिला ठाणे जिल्हा आघाडीने निवेदन पत्राद्वारे केली. हे निवेदन पत्र शिवसेना आघाडीने बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना तहसीलदार मार्फत देण्यात आले. त्यावेळी ठाणे जिल्हे संघटक रेखा खोपकर, शहर संघटक वैशाली शिंदे, उप शहर संघटक अनिता प्रभू, मंजिरी धमाले, शाखा संघटक सीमा पाटील व इतर महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीपी तलाव येथे साचलेला कचरा तातडीने मौजे आतकोली क्षेपणभूमीवर हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू

## तीन सत्रात जादा वाहनांचा वापर करून कचऱ्याचे हस्तांतरण

**ठाणे** :ठाणे शहरातील घनकचऱ्याच्या समस्येवर मात करण्यासाठी सीपी तलाव येथील साचुन राहिलेला कचरा तातडीने मौजे आतकोली येथील क्षेपणभूमीवर हस्तांतरित करण्याची प्रकिया सुरु झालेली आहे.

याकरिता, तीन सत्रात जादा वाहनांचा वापर करुन सीपी तलाव येथील कचऱ्याचे हस्तांतरण करण्यात येत आहे. त्यामुळे येण्र्या पुढील काही दिवसात घरोघरी जाऊन कचरा संकलनाची प्रक्रिया नियमितपणे होईल. वरील अडचणीमुळे शहरात निर्माण झालेले कचऱ्याचे ढीग अतिरिक्त वाहनांचा वापर करुन उचलण्यात येऊन परिसर स्वच्छ करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या देखरेखीत, महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहरात साचलेल्या कचरा उचलण्याचे काम युध्दपातळीवर सुरू असून यासाठी २४ तास यंत्रणा कार्यान्वित राहणार आहे. होळीच्या पुर्वसंध्येला शहरामध्ये स्वच्छता मोहिम राबविण्यात येत आहे.


# अबब ..! ठाण्यात १४ दुकाने फोडली ; २७ हजार ९५० रुपयांचा मुद्देमालावर डल्ला


**ठाणे** : येथील चरई परिसरात एकाच वेळी चोरट्यांनी तब्बल १४ दुकाने फोडल्याची बाब बुधवारी सकाळी समोर आली आहे. यातील आठ दुकानांमधून चोरट्यांनी २७ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल लांबवला आहे. चोरीचा प्रकार सकाळी ६ ते ६.३० या कालावधीत घडलेला आहे.

तर एका दुकानातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात एक जण तसेच दुकान बाहेर ही शटर उचकताना एक जण कैद झाला असून त्यानुसार चोरट्यांचा शोध आहे. याप्रकरणी नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

चरईत बुधवारी सकाळी जनरल स्टोअर, क्लिनिक, आयुर्वेदिक जडीबुटी भांडार आदी १४ व्यावसायिक दुकाने उघडण्यास आल्यानंतर त्यांना दुकानांचे शटर उचकटल्याचे आढळले.

या घटनेची माहिती नौपाडा पोलिसांना मिळाल्यानंतर नौपाडा पोलीस आणि गुन्हे अन्वेषण शाखेचे पथक घटनास्थळी दाखल झाले. १४ दुकानांपैकी आठ दुकानांमधून २७ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याचे समोर आले. याप्रकरणी दुकानदाराने दिलेल्या तक्रारीच्या आधारे नौपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.






पुस्तकासाठी संपर्क:-9860601250